अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार दि. २२ नोव्हेंबर २०२२ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : ५६ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## आज भारत-न्यूझीलंड यांच्यात निर्णायक टी-२० सामना

✔ **नवी दिल्ली** : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी२० मालिका आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पहिला सामना पावसामुळं रद्द झाल्यावर दुसरा सामना भारताने जिंकला. आता अखेरचा सामना उद्या अर्थात मंगळवारी २२ नोव्हेंबर रोजी खेळवला जाणार आहे. भारताने हा सामना जिंकल्यास मालिकाही भारत जिंकेल तर न्यूझीलंडने सामना जिंकल्यास मालिका अनिर्णीत सुटणार आहे.

अशा या निर्णायक सामन्यावेळी पाऊस आल्यास खोळंबा होईल हे नक्की. त्यात पहिल्या दोन्ही सामन्यात पावसाने हजेरी लावली होती.



ज्यामुळे पहिला सामना झालाच नाही. पण दुसरा सामना काहीशा व्यत्ययानंतर अखेर पार पडला.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात २२ नोव्हेंबर म्हणजेच उद्या मंगळवारी होणाऱ्या तिसऱ्या आणि टी२० मालिकेतील शेवटच्या ढ२० सामन्यात पावसाची शक्यता नाही. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार दुपारच्या वेळे काही प्रमाणाच पाऊस पडू शकतो, पण सामना सायंकाळी सुरु होणार असल्याने सामना सुरू होईपर्यंत पाऊस थांबेल. सामना होणाऱ्या ठिकाणचं किमान तापमान हे १४ अंशांच्या आसपास असणार आहे. कमाल तापमान २८ अंशांच्या आसपास राहील, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. पावसाची शक्यता नाही ही क्रिकेट चाहत्यांसाठी चांगली बातमी आहे.

# थर्ड पीआयला अँटीकरप्शनवाल्यांनी लावला थर्ड, पो.नि.च्या नावाने लाच; दोघांना ठोकल्या बेड्या

✔ सुराज्य/सोलापूर

**एकेकाळी शहरातील विजापूर नाका आणि सदर बझार पोलीस ठाण्यात थर्ड पी.आय. म्हणून वावरणाऱ्या एका एजंटाला सोमवारी सोलापूर अँटीकरप्शनच्या पथकाने थर्ड लावला. पोलीस निरीक्षक आमच्या ओळखीचे आहेत, त्यांच्यामार्फत तुम्हाला मदत करतो, त्यासाठी दीड लाख रुपयांची लाच मागणाऱ्या या थर्ड पी.आय.सह त्याच्या एका साथीदाराला अटक करून बेड्या ठोकल्या. न्यायालयाने या दोघांना एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.**

युवराज भीमराव राठोड (वय-३७, रा.समर्थ नगर,जुळे सोलापूर) व साजन रमेश हावळे (वय-३६, रा.ए विंग ७०५, मंगल रेसिडेन्सी, जुळे सोलापूर) अशी अँटीकरप्शनच्या पथकाने अटक केलेल्या दोघांची नावे आहेत.

त्याचे झाले असे की अँटीकरप्शनकडे येथील विजापूर नाका पोलीस ठाण्यातील अँटीकरप्शनकडे तक्रार करणाऱ्याविरुध्द तक्रारी अर्ज चौकशीकामी आला आहे. त्या अर्जाची सध्या चौकशी पोलीस ठाणे स्तरावर चालू आहे. विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चांगल्या परिचयाचे आहेत, त्यांच्यामार्फतीने अर्ज चौकशीमध्ये सहकार्य करण्यासाठी आणि चौकशीअंती गुन्हा दाखल न करण्यासाठी युवराज राठोड आणि त्याचा सहकारी साजन हावळे यांनी तक्रारदाराकडे तब्बल दीड लाखांची मागणी केली. दरम्यान तक्रारदाराने अँटीकरप्शनकडे तक्रार केली. पडताळणीमध्ये या दोघांनी दीड लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून अँटीकरप्शनच्या पथकाने या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. दोघांनाही अटक करून न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.





### गुन्हे शाखेतही कामकाज

शहर गुन्हे शाखेत यापूर्वी असलेल्या अधिकाऱ्यांसोबतही राठोड याने अशाच प्रकारे सूत जुळवून उद्योग केला होता. त्याकाळात डान्सबारचालकांसोबत मध्यस्थी करण्याची मोठी कामगिरी याच थर्ड पी.आय.ने बजावली होती. त्यासाठी फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या पाठीमागील सरकारी बंगल्यात अनेकवेळा झालेल्या बैठकांनाही थर्ड पी.आय. उपस्थित राहत होता, अशीही नवीन चर्चा पोलिसांमध्येच या घटनेनंतर सुरू झाली आहे.

### ■ काय आहे तक्रारी अर्जात?

शहरातील एका व्यक्तीने फायनान्सद्वारे चारचाकी विकत घेतली होती. काही महिन्यांपूर्वी त्याचे निधन झाले. त्यानंतर ती चारचाकी गाडी त्याची मैत्रीण असलेल्या महिला पोलीस(शहराबाहेर नेमणूक) कर्मचाऱ्याने नेली. ही बाब फायनान्सवाल्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या महिला पोलीस कर्मचाऱ्याकडे चारचाकी किंवा चारचाकीच्या हप्त्यांसाठी तगादा लावला. मात्र त्या पोलीस कर्मचारी महिलेने हप्ते भरण्यास नकार देऊन ती चारचाकी गायब केली. त्यानंतर फायनान्सवाल्यांनी त्या महिला पोलिसाविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दिला. त्याची चौकशी आयटीआय चौकीतील सहाय्यक निरीक्षकांकडे देण्यात आली होती. या प्रकरणात सहकार्य करण्यासाठी राठोड आणि हावळे यांनी त्या महिलेलेकडे दीड लाखांची मागणी केली आणि त्यातच ते फसले.

### ■ सदर बझार व विजापूर नाक्यात थर्ड पी.आय.सारखा वावर

एकेकाळी सदर बझार पोलीस ठाण्यात राठोड याचा मुक्त वावर होता. राठोड हा तिथे थर्ड पी.आय.सारखा वावरत होता. त्यानंतर तेथील वरिष्ठ निरीक्षकांची विजापूर नाका पोलीस ठाण्यात बदली झाली. त्यांच्यासोबत विजापूर नाका पोलीस ठाण्यातही राठोड थर्ड पी.आय.सारखाच वावरत होता. तेथून त्या पोलीस निरीक्षकाची बदली झाल्यानंतर नव्याने रुजू झालेल्या पोलीस निरीक्षकासोबतही राठोड याने सूत जुळवले होते, अशी पोलिसांमध्येच चर्चा सुरू झाली आहे.

### ■ पुन्हा सदर बझार

विजापूर नाका पोलीस ठाण्यातील त्याही पोलीस निरीक्षकांची बदली झाल्यानंतर राठोडने पुन्हा सदर बझार पोलीस ठाण्याकडे मोर्चा वळवला. 'बजरंग बली की जय' म्हणत पुन्हा थर्ड पी.आय.ची भूमिका सुरू केली. तिथेही कोणी तक्रार घेऊन आले की त्यांना गाठून त्यांच्याशी चर्चा करणे, पी.आय. ओळखीचे आहेत, तुम्हाला सहकार्य करतो, असे सांगून उकळाउकळीचे उद्योग सुरू केले होते, अशी चर्चा या घटनेनंतर आयुक्तालयातून ऐकायला मिळत आहे.

### ■ हावळेंनी लावला अनेकांना चुना

निम्म्या किंमतीत दुचाकी/चारचाकी मिळवून देतो अशी थाप मारून साजन हावळे याने सोलापुरातील अनेकांकडून पैसे गोळा केले. काहींना गाड्या दिल्या. काहींना गाड्यांची कागदपत्रेच दिली नाहीत. काहींना तर गाड्याही दिल्या नाहीत आणि घेतलेले पैसेही परत केले नाहीत. या प्रकरणातही हावळेविरूध्द शहरात गुन्हा दाखल झाला आहे. काही दिवसांपूर्वी चोरीचा गुन्हाही हावळेवर दाखल झाला आहे. त्यात त्याने नुकताच जामीन मिळवला आहे.

## वैरागमध्ये तळ्यात बुडून १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू


✔ सुराज्य/वैराग

भावांसोबत कपडे धुण्यासाठी गेलेल्या तरुणाचा तळ्यात बुडून सोमवारी दुपारी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अलीम रहीमखान पठाण (रा.उस्मानाबाद) यांनी मयताची माहिती दिल्याने वैराग पोलिसात मृत्यूची नोंद झाली आहे.

उस्मानाबाद येथील शहाबाज सलीम पठाण (वय १८) हा उदरनिर्वाहासाठी आपल्या आई ,वडील व भावासोबत वैराग येथील सिध्दार्थ नगर मध्ये राहत होता. सोमवारी दुपारी शहाबाज हा भाऊ शहनवाज व शाहीद यांच्या सोबत मोहोळ रोडवरील डॉ. शिरीष भूमकर यांच्या शेता जवळील तळ्यावर कपडे धुण्यासाठी गेला होता. भाऊ कपडे धूत होते त्यावेळी शहाबाज तळ्यामध्ये पोहण्यासाठी तळ्यात उतरला, त्याला पाण्याचा अंदाज आला नाही. त्याला व त्याच्या भावाला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडाला. शहाबाजला वाचवण्यासाठी भावांनी प्रयत्न केला परंतु त्यांना यश आले नाही. वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रात त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. डोळ्यादेखत आपल्या भावाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.



## आफताबची पॉलिग्राफ चाचणी होणार



✔ **नवी दिल्ली** : श्रद्धा वालकर हत्याप्रकरणी आरोपी आफताबची नार्को चाचणी आज होणार नाही. नार्को चाचणीआधी त्याची पॉलिग्राफ चाचणी होणं गरजेचं आहे आणि पॉलिग्राफ चाचणीसाठी कोर्टाची परवानगी आवश्यक आहे. त्यामुळे आफताबच्या नार्को चाचणीसाठी पोलीस आता कोर्टाच्या परवानगीची वाट पाहत आहेत. कोर्टाने जर ही परवानगी दिली तर आफताबची पुढच्या १० दिवसात या दोन्ही चाचण्या केल्या जातील. श्रद्धा वालकर हत्याकांडामध्ये अनेक गोष्टींचा उलघडा अद्याप झालेला नाही. तिच्या मृतदेहाचे शीर अद्याप पोलिसांच्या हाती लागलं नाही.



नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांचे औक्षण करून स्वागत

## सोलापूर शहर विकासासह व नागरिकांच्या प्रश्नाला प्राधान्य देणार

✔ सुराज्य/सोलापूर

शहराचे प्रश्न सोडविणे आणि येथील नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यास प्राधान्य राहील तसेच महत्त्वाच्या विषयांची माहिती घेऊन त्यादृष्टीने काम करणार असल्याचे महापालिकेच्या नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले. नूतन आयुक्त शीतल तेली -उगले या सोमवारी सकाळी महापालिकेत रुजू झाल्या. त्यांचे औक्षण करण्यात आले. कर्मचारी व अधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले.

महापालिका पत्रकार संघाच्या वतीने नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्या म्हणाल्या, आयुक्त म्हणून रुजू झाले. आनंद झाला. सर्वांकडून कळाले की मी येथील पहिली महिला आयुक्त आहे पण सांगू इच्छिते की, ज्या खुर्चीवर बसते आहे, तिला महिला किंवा पुरुष असे काही नसते. मी आयुक्त आहे. साहजिकच शहराचे प्रश्न सोडविणे आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करणे याला प्राधान्य राहील. महत्त्वाच्या योजना व विषयांची माहिती घेऊन त्या दृष्टीने काम करणार आहे. शहराचा विकास कसा होईल याकडे माझे व महापालिका प्रशासनाचे लक्ष राहील असेही त्यांनी सांगितले. सुरुवातीला उपायुक्त मच्छिंद्र घोलप,उपायुक्त विद्या पोळ, सहाय्यक आयुक्त विक्रम पाटील, मुख्य लेखापाल रूपाली कोळी, नगर अभियंता संदीप कारंजे,आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक राहुल कुलकर्णी यांच्यासह अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

**स्वागतानंतर घेतली अधिकाऱ्यांची आढावा बैठक**

महापालिकेत पदभार घेतल्यानंतर नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांचे सर्व अधिकारी, विभाग प्रमुखांनी स्वागत केले. पदभार घेतल्यानंतर तातडीने नव्या आयुक्तांनी महापालिकेच्या उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि सर्व विभाग प्रमुख यांची आढावा बैठक घेऊन माहिती घेतली.

## नासाची ओरिअन कॅप्सूल चंद्रावर

✔ **वॉशिंग्टन** : नासाची ओरियन कॅप्सूल आज चंद्रावर पोहोचली. चंद्राच्या मागच्या बाजूने फेरी मारत या कॅप्सूलने चंद्राच्या कक्षेत विक्रमी ८० मैलांचं अर्थात १२८ किमी अंतर कापलं. पृथ्वीपासून २३२,००० मैलपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या चंद्राच्या मागून कॅप्सूल बाहेर येईपर्यंत ह्यूस्टनमधील फ्लाइट कंट्रोलर्सना अर्ध्या तासाचं कम्युनिकेशन ब्लॅकआउट पहायला मिळाले.



दरम्यान ५० वर्षांपूर्वी नासाच्या अपोलो' हे यान चंद्रावर पाठवलं होतं, त्यातून निल आर्मस्ट्रॉंगनं चंद्रावर पहिलं पाऊल ठेवलं होतं. त्यानंतर आता ओरिअन कॅप्सूलने चंद्राला भेट दिल्याची ही पहिलीच वेळ आहे. या कॅप्सूलने फ्लोरिडाच्या केनेडी या अवकाश प्रक्षेपण केंद्रातून गेल्या बुधवारी ब्लास्टिंग केलं होतं, त्यानंतर काही हजार मैलांवर जाऊन ते बंद करण्यात आलं होतं. त्यावेळी पहाटे घेतलेल्या व्हिडीओत चंद्र खूप मोठा दिसत होता.

## चिमणीची सुनावणी आता ५ डिसेंबर रोजी

✔ सुराज्य/सोलापूर

होटगी रोडवरील सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ९२ मीटर उंचीच्या चिमणी संदर्भात आता ५ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. नवीन महापालिका आयुक्त शीतल उगले यांच्यासमोर ही सुनावणी होणार आहे.

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी श्री सिध्देश्वर कारखान्याने बांधलेल्या बेकायदेशीर चिमणी संदर्भात कारखान्याला आता नव्याने नोटीस पाठवली असून दि. २१ नोव्हेंबर रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याचे कारखान्याला कळविण्यात आले आहे. त्यापूर्वीच पालिका आयुक्त पि शिवशंकर यांची बदली झाली. सोमवारी नूतन आयुक्त शीतल तेली उगले यांनी पदभार घेतला. त्यांनी कारखान्याला बोलवण्यात आले होते. कारखान्याच्यावतीने म्हणणे मांडण्यासाठी पुन्हा मुदत मागितली. दुसरीकडे आयुक्तांनी नुकताच पदभार घेतला होता. त्यांनाही प्रकरणाची माहिती घेण्यासाठी कालावधी आवश्यक होता. त्यासाठी ५ डिसेंबरची तारीख देण्यात आली.



**चिमणी प्रकरणी सोमवारी एनजीपीकडेही सुनावणी होती. तिथेही कारखान्याच्यावतीने पुढील तारखेची मागणी करण्यात आली. त्यावेळी एनजीपीनेही सतत पुढच्या तारखेच्या मागण्या करत असल्याबद्दल कारखान्याला सुनावल्याची माहिती आहे.**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सरकार नाही, इथ स्वत:लाच व्यवसाय सुरू करावा लागतो!

| कल्याण |
| --- |
| 268-68-288 |

| मेन बाजार |
| --- |
| 250-71-380 |


# चालू बील भरलेल्या कृषीपंपाच्या वीजजोडण्या कापू नका

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे महावितरणला निर्देश

✔ सुराज्य/मुंबई

**काही महिन्यांपूर्वी राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्यादृष्टीने शिंदे-फडणवीस सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्या शेतकऱ्यांनी शेतीपंपाचे चालू बिल भरले आहे, अशा शेतकऱ्यांच्या वीजजोडण्या कापू नयेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे बळीराजाला तात्पुरता का होईना पण दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये महावितरणकडून वीजबिल न भरलेल्या शेतकऱ्यांच्या कृषीपंपांचे कनेक्शन कापले जात आहे. या कारवाईमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले होते.**

वीज बिल न भरल्याने वसुली सुरू असते. परंतु, अतिवृष्टीमुळे यंदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पिकांचं नुकसान झाल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना सूट द्यावी, असे फडणवीस यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांकडून सध्याचे बिल घ्या, इतर वसुली नंतर घ्या. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन लगेच कापू नका, असा सूचनाही फडणवीसांकडून देण्यात आल्या आहेत.



गेल्या काही दिवसांमध्ये महावितरणने वीजबिलाची थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांवर कारवाईचा धडाका लावला होता. काही जिल्ह्यांमध्ये महावितरणकडून शेतकऱ्यांनी बिलाचे पैसे भरावेत, यासाठी ट्रान्सफॉर्मर्स बंद केले होते. तसेच लहान डीपी काढण्याचा सपाटा लावला होता. शेतकऱ्यांनी किमान दोन महिन्यांची वीजबिलाची थकबाकी भरावी, असा महावितरणचा आग्रह होता. मात्र, तरीही बिल न भरलेल्या शेतकऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला होता. त्यामुळे आता कुठे अतिवृष्टीच्या संकटातून उभारी घेऊ पाहत असलेले शेतकरी हवालदिल झाले होते. परंतु, आता देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर या शेतकऱ्यांना तात्पुरता का होईना, दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रातील बऱ्याच भागांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती पाहता आता रब्बीच्या पेरण्या किंवा नव्या पिकांसाठी प्रयत्न सुरू असतील. ही गोष्ट लक्षात घेऊन मी महावितरणच्या अधिकाऱ्यांना असं सांगितलं की, जे बिल भरू शकतात त्यांनी बिल भरलं पाहिजे. पण जे अडचणीत आहेत त्यांनी सध्याचं बिल जरी भरलं तरी त्यांना सूट देण्यात यावी. त्यांचं वीज कनेक्शन तोडू नये, भविष्यात त्यांच्याकडून आपल्याला वसुली करता येईल. अतिवृष्टी झालेल्या भागात सक्तीची वसुली करु नये, केवळ एक बिल घेऊन विषय बंद करायला मी सांगितलं आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आली.